International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज व्यवस्था ७३ वी घटनादुरुस्ती

**प्रा. डॉ. सोमगोंडे एन. एस.**

जवाहर महाविद्यालय अणदूर, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

---

### प्रास्ताविक

ग्रामपंचात हा स्थानिक स्वशासनाचा व शासनाच्या प्रशासनाचा महत्वाचा घटक म्हणून प्राचीन काळापासून अस्थित्वात आहे. ब्रिटीश राजवटीत ग्रामपंचायातीवर पूर्णपणे शासनाचे नियंत्रण होते. इंग्राजानी अंशतः स्वायतत्ता दिली. लॉड मेयो, लॉड रिपन यांच्या काळात कांही प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली आली. १९३५ च्या कायद्याने स्थानिक स्वशासन हा विषय पूर्णपणे प्रांताच्या अधिपत्याखाली ठेवण्यात आला. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्यकाळात १९८९ साली पंचायत राज्य व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणणारे ६४ वी राज्यघटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. २१ जून १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पी व्ही नरसिंहराव पंतप्रधान झाले. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात पंचायत राज्य संस्था ना घटनात्मक दर्जा देण्याच्यादृष्टीने 1992 मध्ये 73 वी घटना दुरुस्ती विधेयक मांडले गेले 73 व 74 वी घटना दुरुस्ती विधेयक भारतीय राज्यकारभार अत्यंत क्रांतिकारक समज ल्या जातात या दोन्ही घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण आणि नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना भारतीय राज्यघटने स्थान प्रदान करण्यात आले या दोन्ही घटना दुरुस्ती भारतीय स्थानिक स्वशासनाच्या केंद्रबिंदू व मानबिंदू ठरल्या आहेत.

**उद्देश:- १) पंचायत राज्य व्यवस्थेचा अभ्यास करणे**

**२) पंचायत राज व्यवस्था व 73 वी घटना दुरुस्ती जाणून घेणे**

संसदेच्या दोन्ही सभागृहात पारित झाल्यानंतर 17 घटक राज्यांनी विधेयकांना संमती दिली 25 एप्रिल 1993 रोजी या घटनादुरुस्ती कायद्यात अंमलबजावणी सुरू झाली . या देशात एका नवीन पर्वाला आरंभ झाला ही घटना दुरुस्ती निश्चितच क्रांतिकारी दुरुस्ती समजली पाहिजे या घटनादुरुस्तीने कायदेमंडळसारख्या प्रत्येक्ष मतदार पद्धतीने पंचायतराज संस्थेच्या निवडणुका झाल्या. सर्वत्र महिलांसाठी राखीव जागा ठेवणारी या संस्थांसाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची निर्मिती करणारी स्वतंत्र वित्त आयोगाची निर्मिती करणारी अशी घटना दुरुस्ती भारतीय राज्यघटनेच्या घटना दुरुस्ती च्या इतिहासात निश्चित स्वरूपात क्रांतिकारी घटना दुरुस्ती आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



88

**३व्या घटना दुरूस्तीमध्ये मुख्य तरतुदी:-**

**त्रिस्तरीय व्यवस्थेला घटनात्म दर्जा प्राप्त:-** ग्रामीण स्थानिक प्रशासनाच्या व्यवस्थेसाठी त्रिस्तस्थरावर अशा संस्था निर्माण करण्याचे राज्य सरकारांना बजावले गेले. भारताच्या राज्यघटनेत पहिल्यांदाच हि तरतूद झाली. राज्याघटनेचा ९ वा भाग कलम २४२ ते २४३ ओ अशी एकूण 16 कलमे व एक नवीन ११ वे परीशिष्ठ एवढ्या तरतुदी करून ग्रामीण स्थानिक स्वयंशासन संस्थाना त्यांना भारताच्या राज्यघटनेत स्थान दिले.

**ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त :-** संपूर्ण गावातील स्थानिक प्रशासनाच्या कायदे मंडळात्मक स्वरूपाचा घटक म्हणून ग्रामसभेला राज्यघटनेत स्थान देण्यात आले. संपूर्ण गावासाठी ग्रामसभा असेल गावातील सर्व पौढ स्त्री पुरुषांच्या त्यामध्ये समावेश असेल. त्याची स्वतंत्र निवडणूक यादी असेल. त्यामध्ये सर्व पौढ मतदारांची नावे असतील ही ग्रामसभा पंचायतीचे निर्मीती करणार घटक असेल.

**त्रिस्तरीय व्यवस्था:-** पंचायतराज व्यवस्था ही त्रिस्तरीय असेल गाव पातळीवर विकासगटाच्या पातळीवर व जिल्ह्याच्या पातळीवर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे या संस्था स्थापन केल्या जातील मतदारसंघ निर्माण करून प्रतिनिधी क लोकशाहीचे तत्व मुळापर्यंत रुजवीण्याचा प्रयत्न या दृष्टीने केला आहे . प्रत्येक संस्थेचा प्रमुख राज्य सरकारने केलेल्या कायद्याप्रमाणे निवडला जावा ज्या राज्याची लोकसंख्या २० लाख पेक्षा कमी असेल त्या राज्यांना त्रिस्तरीय व्यवस्थामधून सुट देण्यात आली आहे.

**विविध आरक्षणांची व्यवस्था;-** ७३ व्या घटनादुरुस्तीने विविध जातींना आरक्षण दिले आहे , कलम २४३ डी अन्वये अनुसूचित जाती व जमाती ना पंचायतराज संस्थांमध्ये राखीव जागा ठेवण्या चे बंधन घातले गेले आहे . एकूण लोकसंख्येच्या 25 टक्के अनुसूचित जा मातीचे असेल तर पंचायतीमध्ये त्यांची सभासद संख्या 25 टक्के एवढी असेल व त्याचपद्धतीने अनुसूचित जातींची असे नवीन घटनादुरुस्तीनुसार स्त्रियांसाठी एकूण संस्थेच्या एक तृतीयांश पेक्षा स्त्रियांची संख्या कमी असतात कामा नये . इतर मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवण्या चा अधिकार राज्य शासनाला दिले आहे . अध्यक्षपद आरक्षण किंवा रोटेशन आळीपाळीने स्वीकारण्याचीं तरतूद करण्यात आली.

**कार्यकाळ:-** प्रत्येक पंचायातीचा कार्यकाल हा ५ वर्षाचा असेल हा कार्यकाळ त्यांच्या पहिल्या बैठकीपासून प्रारंभ होईल . कायद्यातील तरतुदीनुसार पंचाय ती बरखास्त केल्या जाऊ शकतील पंचायत पूर्ण कार्यकाळ होण्याअगोदर जर बरखास्त करण्यात आली असेल तर सहा महिन्याच्या आत तिची निवडणूक घेतली पाहिजे ती पंचायत ५ वर्षाची असेल , एखादी पंचायत सहा महिन्यापेक्षा अधिक कार्यकाळ राहिला असेल आणि ती बरखास्त झाली असेल तिच्या निवडणुकीनंतर ती तिचा नियोजित राहिलेल्या कालावधीसाठीच निवडली गेली असणार.

**सदस्यांचीची अपात्रता:-** राज्याच्या कायदेमंडळाने स्वतःच्या अपात्र तेसंबंधित निकष तयार करायचे व त्याची अंमलबजावणी करायाची हे या घटनादुरुस्तीच्या अत्यंत महत्त्वाचे आहे . विधानसभेसाठी वय वर्ष 25 पूर्ण असावे. विधान परिषदेसाठी ३० वर्षे पूर्ण असले पाहिजे पंचायत मध्ये सदस्य म्हणून प्रवेश करण्यासाठी २१ वर्ष पूर्ण करणे आवश्यक आहे . पंचायतीच्या सदस्यांच्या पात्रते- अपात्रेत संबंधी प्रश्न निर्माण झाल्यास राज्याचे कायदेमंडळा नी ठरविल्याप्रमाणे तो सोडविला जाईल त्यासाठी ज्या अधिकाऱ्यांना हा अधिकार प्राप्त असेल त्यांचे निर्णय अंतिम असेल.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,



89

**पंचायतींचे अधिकार:-** ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतचे अधिकार जबाबदारी व त्यांचे उत्तरदायित्व या संबंधित तरतुदी केल्या आहेत. आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी नियोजन करणे आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी तयार केलेल्या नियोजनाची अंमलबजावणी कर णे ११ व्या परिशिष्टात समावेश केलेल्या योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. ११ व्या परिशिष्टात 29 विषय आहेत.

**वित्तीय अधिकार व वित्तीय साधने:-** राज्य सरकार पंचायत संस्थांना कर आकारण्याचे व ते वसूल करण्याचे व त्यांचे नियोजन करण्याचे अधिकार देईल. राज्य सरकारच्या विविध करांचे कर लागू करण्यापासून ते कर वसुली करणे इत्यादी कामे पंचायत संस्थेवर सोपवली जातील. संचित निधीतून पंचायत संस्थांना अनुदान देण्याची व्यवस्था व घटनादुरुस्तीनुसार येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कर्जरोखे काढून निधी उपलब्ध करून घेण्या ची पंचायतींना अनुमती घटनादुरुस्तीने दिली आहे.

**वित्त आयोग:-** ७३ व्या घटनादुरुस्तीच्या अमलबजावणी पासून म्हणजे २५/०४/१९९३ पासून एक वर्षाच्या कालावधी राज्य सरकार एक वित्त आयोग निर्माण करेल आणि हा वित आयोग पंचायतीच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करून राज्य शासनाला शिफारशी करेल. राज्याच्या महसुलाची विभागणी कशी केली जावी म्हणजे पंचायत राज संस्थांना किती व कसा वाटा दिला जावा या संबंधित शिफार शी क रिल. पंचायतीने कोणते कर बसवावे याची शिफारस हा आयोग करील . पंचायतीच्या अनुदानसंबंधित विचार हाच आयोग करेल . या आयोगाच्या निर्मिती यासंबंधी चे अधिकारी राज्या च्या कायदेमंडळाला असेल.

१९९४ ला पहिले वित्त आयोग स्थापना केली. पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून माजी खासदार व माजी महसूल मंत्री श्री शांताराम घोलप यांची निवड झाली हा आयोग राज्यपालाला जबाबदार असेल. आयोगाचा अहवाल ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत राज्यपालांना सादर करण्यात येईल असे जाहीर केले. या अहवालातील शिफारसी १ एप्रिल १९९६ पासून पाच वर्षांकरिता लागू असतील. व्यवस्थापकिय संचालक व उपाध्यक्ष म्हणून काम पाहत अस लेले श्री.आर.सी. सिन्हा, आय. ए. एस. यांनी राज्य वित्त आयोग सदस्य सचिव म्हणून नियुक्ती केली.

**राज्य निर्वाचन आयोग:-** कलम २४३ के प्रमाणे राज्यातील पंचायतराज्य व संस्थेच्या निवडणुका स्वच्छ वातावरणात पार पडण्यासाठी राज्यसरकार एका निर्वाचन आयोगाची निर्मिती क रिल. निर्वाचन आयोग मतदाराचे यादी तयार करणे , मतदार संघ तयार करणे, जागांची संख्या निश्चित करणे व नियम निवडणुकांच्या संबंधित सर्व कार्ये हा आयोग क रील. निर्वाचन आयोगाचे अध्यक्षला स्वतंत्र दर्जा दिला आहे . त्यांचे स्वतंत्र अबाधित राखण्यासाठी खास तरतूद केली आहे . उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश यांना बडतर्फ करण्यासाठी जी पद्धत वापरली जाते तिच पद्धत अध्यक्षला वापरली जाते . न्यायालयांना राज्य निर्वाचन आयोगाचे एकूण कामकाजयाबद्दल कसलाही हस्तक्षेप न्यायालयाला करता येणार नाही. ७३ व्या घटनादुरुस्तीने राज्य निर्वाचन आयोगाचे स्वातंत्र अबाधित ठेवले ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण बाब म्हणावी लागेल.

**लेखापरीक्षण:-** घटक राज्याच्या कायदेमंडळाने कायदा करून पंचायतराज संस्था नी आणि सर्व हिशोब कसे ठेवावेत व त्या हिशोबाची तपासणी कशी करून घ्यावी यासंबंधच्या तरतुदी करण्यात लेखापरीक्षणाचे कार्य हे फारच अनियमित होते. लेखापरीक्षणा बाबतीत पंचायती अत्यंत निष्काळजी राहत असत . यावर उपाय म्हणून 73 व्या घटना दुरु स्तीत लेखापरीक्षणाची तरतूद करण्यात आली.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



90

**विविध क्षेत्रांना हा भाग प्रयुक्त न होणे:-** या घटना दुरुस्तीतील काही तरतुदी काही राज्यांसाठी व काही भूप्रदेशासाठी लागू असणार नाही. नागालँड मेघालय पश्चिम बंगाल लिंग व गुरु का पहाडी व पर्वतीय क्षेत्रात या तरतुदी लागू असणार नाही . नागालँड मेघालय व मिझोरम मणिपूर पश्चिमि बंगालच्या दार्जीलिंग व गुरखा पहाडी पर्वतीक्षेत्रांना या तरतुदी लागू असणार नाही.

## सारांश

73 व्या घटनादुरुस्तीने अशाप्रकारे भारताच्या ग्रामीण भागात प्रतिनिधीच्या लोकशाहीच्या प्र स्थापना करण्याचे एका महत्वाचे पाऊल म्हणावे लागेल. घटनात्मक दर्जमूळे पंचायतराज संस्थांना अधिक बळ प्राप्त झाले . हे सत्य नाकारता येत नाही . या घटनादुरुस्तीनुसार प्रशासन राज्य किय व पदाधिकारी नोकरशाही व्यवस्था यांचे प्रबोधन व प्रशिक्षण होणे गरजेचे आहे . ७३ वी दुरुस्ती हि काही अंतिम व्यवस्था नाही. काळानुसार या दुरुस्तीमध्ये अनेक सुधारणा व अनेक फेरबदल होत राह तील. भविष्याचा विचार करता ती घटनादुरुस्ती अत्यंत उपयुक्त आहे. या दुरुस्तीची प्रभावी अंमलबजावणी होणे हि काळजी गरज आहे.

## संदर्भ

1) **महाराष्ट्र शासन व राजकारण :- प्रा. के. आर. बंग.**
2) **महाराष्ट्र शासन व राजकारण :- प्रा.भिवशंकर.**
3) **महाराष्ट्र शासन व राजकारण :- प्रा. अशोक जैन.**
4) **महाराष्ट्र टायम्स ब दैनिक लोकमत.**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



91